https://corp.idbibank.co.in/corp/BANKAWAYTRAN;jsessionid=00...

Hc* Payment Successful. Your Payment Confirmation Number is 98149654

CHALLAN

MTR Form Number - 6

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| GRN NUMBER | MH003714922201617R | BARCODE | | Form ID : | Date: 24-08-2016 |
| Department | IGR | | Payee Details | | |
| Receipt Type | RE | | Dept. ID (If Any) | | |
| Office Name | IGR312-NSK2_NASHIK 2 JOINT SUB REGISTRAR | Location | PAN No. (If Applicable) | PAN-AQDPM9215C | |
| Year | Period: From : 24/08/2016 To : 31/03/2099 | | Full Name | KHILENDRAKUMAR DILIP MOHABIYA | |
| Object | | Amount in Rs. | Flat/Block No. Premises/ Bldg | S NO 27 B 14 PLOT NO 35 PAIKI | |
| 0030046401-75 | | 305000.00 | Road/Street, Area /Locality | CTS NO 2566 | |
| 0030063301-70 | | 30000.00 | Town/ City/ District | DASAK NASHIK NASHIK Maharashtra | |
| | | 0.00 | PIN | 4 2 2 1 0 1 | |
| | | 0.00 | Remarks (If Any) : | | |
| | | 0.00 | | | |
| | | 0.00 | | | |
| | | 0.00 | | | |
| | | 0.00 | | | |
| | | 0.00 | | | |
| Total | | 335000.00 | Amount in words | Rupees Three Lakhs Thirty Five Thousand Only | |
| Payment Details:IDBI NetBanking Payment ID : 98149654 | | | FOR USE IN RECEIVING BANK | | |
| Cheque- DD Details: | | | Bank CIN No : 69103332016082450534 | | |
| Cheque- DD No. | | | Date | 24-08-2016 | |
| Name of Bank | IDBI BANK | | Bank-Branch | | |
| Name of Branch | | | Scroll No. | | |

Stamp: नासक - 2 / 1096 / 2016 / 9 / 123

Seal: SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASHIK

Authorised Signatory    Authorised Signatory

... BANK LTD.

8/24/2016 1:03 PM

SEAL OF THE JOINT JOINTSUB-REGISTRAR CLASS II
NASHIK 2

नसान - २
५२२३ )२०१६
२ / २३

| |
|---|
| विभाग क्र. 10.1 (दर – प्लॉट : 6750/– निवासी : 20000/–) |
| प्लॉटचे शासकीय मुल्यांकन रूपये<br>471.42 चौ.मी. x 6750+25%=8438=39,78,000/– |
| शासकीय नियमाप्रमाणे रहिवासी बांधीव मोबदला रूपये<br>285.68 चौ. मी. x 20000=57,13,600/– |
| विकास शुल्क रूपये 2,55,400/– |
| डिपॉझिट वरील व्याज रूपये 1,30,000/– |
| एकूण 60,99,000/– |
| स्टॅम्प रूपये 3,06,000/– |
| नोंदणी फी रूपये 30,000/– |

॥ श्री ॥

# विकसन करारनामा
## ( डेव्हलपमेंट अॅग्रीमेंन्ट )

डेव्हलपमेंट अॅग्रीमेंन्ट आज दिनांक 24 माहे ऑगस्ट इसवी सन 2016 रोज बुधवार ते दिवशी नाशिकरोड मुक्कामी :–

– 2 –

नसन - २

२ ४००३ /२०१६

... 2 ...

३ / २३

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS II · NASHIK-2 ·
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२

| | |
|---|---|
| एन.एस.के. डेव्हलपर्स<br>तर्फे प्रोप्रायटर<br>**श्री. खिलेंद्रकुमार दिलीप मोहबिया**<br>उ. वय. 30 वर्षे, धंदा – व्यापार<br>**PAN – AQDPM9215C**<br>राहणार – प्लॉट नंबर 9, साई दर्शन,<br>जनाई नगर, कॅनॉल रोड, दसक, जेलरोड,<br>नाशिकरोड | लिहुन घेणार |

– यांसी –

| | |
|---|---|
| **1) श्री. विजय अशोक धात्रक**<br>उ. वय. 32 वर्षे, धंदा – व्यापार<br>**PAN – AJVPD7208F**<br>**2) श्री. सुनिल अशोक धात्रक**<br>उ. वय. 30 वर्षे, धंदा – व्यापार<br>**PAN – AJZPD6408M**<br>दोघे राहणार – धात्रक चाळ, रूम नं. 3,<br>व्यापारी बँकमागे, जेलरोड, नाशिकरोड | लिहुन देणार |

कारणे विकसन करारनामा लिहून व सह दुय्यम निबंधक वर्ग 2 नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून देतात ऐसा जे की :–

(1) **मिळकतीचे वर्णन :–**

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील, मौजे दसक या गांवचे शिवारातील **सर्व्हे** क्रमांक 27ब/14 याचे मंजूर ले–आऊट प्लॅनपैकी **प्लॉट नंबर 35** यांसी **क्षेत्र 951.42 चौरस मीटर पैकी सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे** **<u>471.42 चौरस मीटर</u>** यांसी सिसनं 2568पैकी यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :–

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2

दस्त ४९९३ /२०१६
४ / २३

... 3 ...

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | प्लॉट नंबर 35 पैकी 180 चौरस मीटर क्षेत्र व त्यापलीकडे प्लॉट नंबर 36 |
| पश्चिमेस | : | प्लॉट नंबर 35 पैकी 300 चौरस मीटर क्षेत्र व त्यापलीकडे 30 फुट रुंदीचा रस्ता |
| दक्षिणेस | : | सर्व्हे नंबर 27/सी/1 |
| उत्तरेस | : | 20 फुट रुंदीचा रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत जल, तरू, काष्ट, पाषाण, **निधीनिक्षेप, तदंगभुत वस्तुंसहीत दरोबस्त मिळकत.**

वर कलम 1 यांत वर्णन केलेल्या मिळकतीचा उल्लेख **"सदर मिळकत", लिहून देणार** यांचा उल्लेख **"आम्ही", लिहून घेणार** यांचा उल्लेख **"तुम्ही"** असा करण्यांत आलेला आहे. या संज्ञामध्ये या प्रत्येकाचे वंशवारस, कुटुंबीय, प्रतिनिधी, असायनीज, अँडमिनीस्ट्रेटर्स, लिगल रिप्रेझेंटेटीव्ह, सक्सेसर या सर्वांचा समावेश आहे.

(2) वर कलम 1 यात वर्णन केलेली मिळकत ही लिहून देणार यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत लिहून देणार यांना श्रीमती. म्हाळसाबाई शिवा धात्रक यांनी दिनांक 7/1/2014 रोजी बक्षिस पत्राने दिलेली आहे. सदरचे बक्षिस पत्र मे. सह दुय्यम निबंधक वर्ग 2 नाशिक 2 यांचे कार्यालयात दस्त नोंदणी क्रमांक 359 दिनांक 9/1/2014 अन्वये नोंदवुन दिलेले आहे. तशी रेकॉर्ड ऑफ राईटसला 7/12 सदरी मालकी हक्कांत लिहून देणार यांचे नावाची फेरफार नोंद क्रमांक 14183 अन्वये नोंद झालेली आहे. सदर मिळकतीची पाहिजे तशी विल्हेवाट लावण्याचा लिहून देणार यांना पुर्णपणे हक्क व अधिकार आहे.

त्या हक्क व अधिकारात लिहून देणार यांनी सदर मिळकत विकसीत करण्यास देण्याचे ठरविलेले असुन लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभात सदरचा डेव्हलपमेंट करारनामा व जनरल मुखत्यार पत्र लिहून व नोंदवून देत आहे.

नसन - २

स ५८८३ )२०१६

५ / २३



SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASHIK-3
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-३

(3) वर कलम 1 यात वर्णन केलेल्या मिळकतीचा 7/12 उतारा व सिटी सर्व्हेचा उतारा हा संपुर्ण क्षेत्राचा आहे. सदर मिळकतीचे सिटी सर्व्हे रेकॉर्डप्रमाणे 1092.00 चौरस मीटर क्षेत्र व 7/12 प्रमाणे 951.42 चौरस मीटर क्षेत्र असे आहे. सदर एकुण क्षेत्रापैकी वर कलम 1 मध्ये नमुद केलेले फक्त 471.42 चौरस मीटर क्षेत्र सदर विकसन करारनामाचा विषय असलेले क्षेत्र आहे. उर्वरीत क्षेत्रापैकी पश्चिमेकडील 300 चौरस मीटर क्षेत्र हे लिहून देणार यांनी स्वतःकरीता ठेवलेले आहे. त्याप्रमाणे लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचा सब डिव्हीजन प्लॅन तयार करून स्वतंत्र 7/12 उतारा करून द्यावयाचा आहे. त्याकामी येणारा संपुर्ण खर्च लिहून घेणार यांनी करावयाचा आहे. तसा अर्ज नाशिक महानगरपालिका यांचेकडे दाखल असुन त्याचा पोहोच पावती क्रमांक SD / 07 असा आहे. तसेच सदरचा उतारा हा ब्लु प्रिंट दाखल केल्यापासुन कार्यालयीन 60 दिवस मुदतीत करून द्यावयाचा आहे. तसेच पुर्वेकडील 180 चौरस मीटर क्षेत्रावर मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे लिहून देणार हेच मालक या नात्याने स्वतः बांधकाम करणार आहे. येणेप्रमाणे पुर्वेकडील 180 चौरस मीटर क्षेत्राची प्लॉट मिळकत व त्यावर होणारी बांधीव फ्लॅट मिळकत तसेच पश्चिमेकडील 300 चौरस मीटरची प्लॉट मिळकत व त्यावर होणारी बांधीव बंगल्याची मिळकतीशी लिहून घेणार यांचा काही संबंध राहणार नाही व भविष्यात ही कोणत्याही प्रकारे हक्क अधिकार सांगता येणार नाही. तशी 7/12 उताऱ्यावर 180 चौरस मीटर क्षेत्राची आणेवारी लावुन द्यावयाची आहे. तसेच सदर विकसन करारनामाचा विषय असलेल्या 471.42 चौरस मीटर प्लॉटचे क्षेत्रावर विकसन करारनामाप्रमाणे जी मिळकत लिहून घेणार हे विकसीत करणार आहे त्या प्लॉट मिळकत व त्यावरील बांधीव मिळकतीचे लिहून घेणार हे धात्रक हाईटस् या नावाने अपार्टमेंट करणार आहे.

(4) वर कलम 1 यात नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा ले-आऊट मे. सहाय्यक संचालक नगररचना विभाग, जळगांव यांचेकडील पत्र क्रमांक

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2

नसन - २

टं ... ५९९३ )२०१६

६ / २३

डी.व्ही./एन.एस.के./1357 दिनांक 19/6/1973 अन्वये झालेला आहे.

(5) वर कलम 1 यात नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा बिनशेती वापर करण्याकरीता मे. जिल्हाधिकारी सो., नाशिक यांनी त्यांचेकडील हुकूम नं. एलएनडी/II/1066/73 दिनांक 26/7/1973 नुसार परवानगी दिलेली आहे.

(6) वर कलम 1 यात नमुद केलेली प्लॉट मिळकत पूर्णपणे निर्वेध व बोजारहीत अशी असुन आम्ही सदरील मिळकत यापुर्वी कोठेही कोणत्याही प्रकारे गहाण, दान, लिन, बक्षिस, तारण, मृत्यूपत्र, अन्नवस्त्र, यासारख्या जडजोखमांत गुंतविलेल्या नाही अगर सदर मिळकती कोणत्याही दस्ताने तबदिल केलेल्या नाही. सदर मिळकतीचे बाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसुन. मिळकत मनाई हुकूम, जप्ती, जामीनकी, अव्वल जप्ती वगैरे सारख्या कोर्ट हुकूमनाम्याने जप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे मिळकतीचे हद्दीबाबत, कबजाबाबत कोणत्याही दिवाणी अगर रेव्हेन्यु कोर्टात वाद न्यायप्रविष्ठ नाही. आम्ही अन्य कोणासही विसार पावती, साठेखत करारनामा, जनरल मुखत्यार पत्र अगर अन्य प्रकारचा दस्तऐवज लिहून दिलेला नाही, असे खात्रीने सांगुन भरवशाने लिहून देत आहोत.

(7) सदर मिळकतीविषयी लिहून देणार व लिहून घेणार यांचे बरोबर बोलणी करुन वरील मिळकत लिहून घेणार यांनी त्यांचे स्वखर्चाने विकसन करण्याबाबत तयारी दर्शविल्यामुळे लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान मिळकत विकसन करणेकामी अटी व शर्ती ठरल्या आहेत. त्या लेखी स्वरूपात असाव्यांत, त्यामुळे सदरचा डेव्हलपमेंट करारनामा लिहून घेणार यांचे लाभांत लिहून व नोंदवून देत आहे.

**विकसन कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–**

1. **मोबदला :–** सदर मिळकतीचा मोबदला म्हणून लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे **3074.00 चौरस**

नसन - २
दस्त ५८२३/२०१६
७/१२



SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2

फुट म्हणजेच 285.68 चौरस मीटर सेलेबल बिल्ट अप रहिवासी फ्लॅटचे बांधकाम करून द्यावयाचे असे ठरले आहे. सदर क्षेत्रामध्ये टीडीआरचा समावेश आहे. सदर मोबदला म्हणुन द्यावयाच्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खाली परिशिष्ट मध्ये केलेले आहे. लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मोबदल्याच्या स्वरूपात द्यावयाच्या बांधीव मिळकतीमध्ये द्यावयाच्या सुख सुविधा खाली परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या आहे.

लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विकसनापोटी मोबदला म्हणून सदर मिळकतीचा बिल्डींग प्लॅन मंजुर झाल्यापासून **आमचे (लिहून देणार यांचे) हिश्याचे बांधकाम 07** महिने मुदतीत बांधकाम करून प्रत्यक्ष कब्जा द्यावयाचा आहे. सदर मुदतीत लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मोबदला म्हणुन देण्यात येणाऱ्या बांधीव मिळकतीचा ताबा न दिल्यास रक्कम रूपये 35,000/- दरमहीना नुकसान भरपाई म्हणुन लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना द्यायचे आहे.

लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचा संपुर्ण प्रोजेक्ट हा 18 महिने मुदतीत करावयाचा आहे. परंतु काही कायदेशीर व तांत्रिक अडचण आल्यास अथवा लिहून देणार यांना मोबदला म्हणुन देण्यात येणाऱ्या बांधीव मिळकत सोडुन उर्वरीत बांधीव मिळकत प्रोजेक्टचे मुदतीत विक्री न झाल्यास संपुर्ण बांधीव मिळकत विक्री होत नाही तोपर्यंत प्रोजेक्टची मुदत वाढुन दिली आहे असे समजण्यात येईल.

लिहून देणार यांना मोबदला म्हणुन मिळणाऱ्या बांधीव मिळकत विक्री करणे अथवा कर्ज बोजा, तारण, गहाण, दान, लिन, मृत्युपत्र करणेकामी लिहून घेणार यांची संमती घ्यावयाची असुन कोणत्याही प्रकारची हरकत करावयाची नाही. परंतु सदर इमारतीचे अपार्टमेंट मध्ये लिहून देणार यांना सभासद करून देण्याची जबाबदारी लिहून घेणार यांची राहील.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II NASHIK-2
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२



2. लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना **रक्कम रूपये 5,00,000/- (अक्षरी रक्कम रूपये पाच लाख मात्र)** हे रिफंडेबल सिक्युरिटी डिपॉझिट म्हणुन बिनव्याजी दिलेले आहे. सदर रिफंडेबल सिक्युरिटी डिपॉझिट लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना रक्कम रूपये 5,00,000/- (अक्षरी रक्कम रूपये पाच लाख मात्र) चेक नंबर 110056 दिनांक 14/7/2014 कॉसमॉस बँक अन्वये दिलेली आहे. सदरची रिफंडेबल सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम लिहून देणार यांना लिहून घेणार यांनी विकसन करारनामाप्रमाणे बांधकाम पुर्ण झाल्यावर तसेच बांधकाम परवानगीची प्रत, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला, डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंट, मंजुर प्लॅनची प्रत, ले-आऊटची प्रत व डेव्हलपमेंट चार्ज बेटरमेंट चार्जच्या पावत्या ह्या लिहून देणार यांना दिल्यावर परत करावयाची आहे.

3. **कबजा :-** लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदर मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला कबजा विकसन करणेकामी दिलेला आहे कबजाबाबत उभयंतामध्ये तक्रार नाही.

4. वर नमुद केल्याप्रमाणे लिहून घेणार यांचेकडून लिहून देणार यांनी बांधीव स्वरुपात मोबदला घेवुन त्या बदल्यात आम्ही तुम्हांस सदर मिळकत डेव्हलप करण्यासाठी पुढीलप्रमाणे अधिकार दिलेले आहे व स्वतंत्र जनरल मुखत्यार पत्राचा दस्तऐवज आजरोजी तुमचे लाभांत लिहून व नोंदवून देत आहे.

5. वरील मिळकतीची मंजूर ले-आऊट प्रमाणे तुम्ही स्वखर्चाने सरकारी अगर खाजगी मोजणीदाराकडून मोजणी करून घ्यावी व मिळकतीचे क्षेत्र कायम करून घ्यावे व मिळकतीच्या हद्दीच्या निशाण्या कायम करुन घ्याव्यांत व त्याप्रमाणे लॅण्ड रेकॉर्डकडून नकाशे मिळविणे.

6. सदर मिळकतीचे मंजूर ले-आऊट प्लॅनप्रमाणे सदर मिळकतीवर बिल्डींग प्लॅन तयार करून घेणे, त्यासाठी आर्किटेक्ट नियुक्त करणे,

नसन - २
द. ५९९३ /२०१६
८ २३



SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS II NASHIK-2

नियुक्त केलेल्या आर्किटेक्टकडून बिल्डींग प्लॅन मंजूर करणे अगर संबंधीत अधिकाऱ्यांनी काही दुरुस्त्या सुचविल्यास अगर आवश्यक असेल तर बिल्डींग प्लॅन सुधारीत करून घेणे व तो मंजूर करून घेणे, त्यासाठी प्लॅन व प्लॅन मंजूरी सर्व प्रकरणांवर सहया करणे व बिल्डींग प्लॅन संबंधीत अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे व संबंधीत कागदपत्रांवर सहया करणे वगैरे कामे करणे.

7. सदर मिळकतीचे मंजुर ले-आऊट प्लॅनप्रमाणे प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी रेव्हेन्यू / महानगरपालिका इत्यादींकडून जरूर त्या सर्व परवानग्या घेणे, तसेच सक्षम अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, ना.ज.क.म. नाशिक वा अन्य आवश्यक अधिकाऱ्यांची इमारतीचे बांधकामाचे प्रकल्पासाठी परवानगी घेणे.

8. सदरचे प्रकल्पास कोणत्याही अन्य सध्या अंमलात असलेल्या कायदयानुसार अगर यापुढे अंमलात येणाऱ्या कायदयानुसार ज्या-ज्या परवानग्या घेणे आवश्यक आहे, त्या-त्या सर्व परवानग्या घेणे, त्यासाठी अर्ज करणे, अर्जावर सहया करणे, जाबजबाब देणे व जरूर त्या सर्व परवानग्या घेणे व बांधकाम करणे, बांधकामासाठी सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या बांधकामाचे सामान स्वतःजवळ बाळगणे व त्यांचा वापर बांधकामात करणेसाठी तात्पुरते साठा गोडाऊन करणेचा जरूर तो परवाना (लायसन्स) संबंधीत अधिकाऱ्यांकडून मिळविणे, तसेच सदर मिळकतीचे बांधकाम परवानगीपासून तर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळेपावेतोची सर्व कामे करणे, तसेच सदर मिळकतीवर लाईट कनेक्शन मिळवणेकामी एमएसईबीकडे अर्ज करून आवश्यक ती पूर्तता करणे, तसेच पाणी कनेक्शनसाठी नाशिक महानगरपालिकेकडे अर्ज करून आवश्यक ती पूर्तता करणे.

9. सदर मिळकतीत बांधकामाचे मटेरिअल ठेवणेसाठी व त्यांचे संरक्षणासाठी तात्पुरत्या शेडस् उभारणे, वॉचमन ठेवणे मिळकतीचे

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II
सह दुय्यम निबंधक वर्ग २, नाशिक-२
NASHIK-2

नसन - २
४९९३ )२०१६
१० / २३

ठिकाणी मोठया आकाराची इमारतीचे प्रकल्पाची माहिती देणारा जाहिरातीचा बोर्ड उभा करणे, स्थानिक अगर अन्य वृत्तपत्रांत जाहिरात करुन वा खाजगीरित्या प्रतिनिधी नियुक्त करुन बांधकामाचे प्रकल्पास प्रसिध्दी देवुन प्रसार करणे.

10. सदर मिळकतीचे बिल्डींग प्लॅनप्रमाणे बांधकाम पुरे करण्यास सुरुवात करणे फ्लॅटस् विक्री करण्याकरीता इच्छुक खरेदीदार पहाणे, त्यांचेबरोबर खरेदीविषयी बोलणी वगैरे करणे, खरेदीच्या अटी, नियम व शर्ती ठरविणे, त्या अटी व शर्तीनुसार सौदा पावती / विसार पावती / साठेखत / खरेदीखत / डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंट / चुक दुरुस्ती पत्र लिहुन व अगर नोंदवून देणे, त्यासाठी कायद्याने आवश्यक त्या परवानग्या घेणे, किंमतीपोटी ठरलेल्या रक्कमेचा भरणा घेणे, इच्छुक फ्लॅटस् खरेदी घेणारे ग्राहकास वित्तसहाय्य संस्थेकडून कर्ज उपलब्ध होणेसाठी सहकार्य करणे, त्यासाठी कागदपत्रांच्या नक्कला देणे, तसेच टायटल सरकारी वकीलांचे सर्टिफिकेट्स देणे, त्यासाठी कर्ज प्रकरणांवर सह्या करणे.

11. सदर मिळकतीत बांधून होणारे फ्लॅटस् विविध व्यक्तींना विकण्यात येणारे आहेत व त्यामुळे सदरचे मिळकतीतील इच्छुक खरेदीदारांची एक संघटना (असोसिएशन) संस्था (सोसायटी कंपनी) वा अपार्टमेंट संस्था स्थापित करणे, त्यासाठी जरुर ते कागदपत्र तयार करुन अशी संस्था सहकार खात्याकडे अगर संबंधीत अधिकाऱ्यांकडे नोंदवून घेणे, व संस्था नोंदवून घेणे, त्यानंतर संपूर्ण इमारत प्रकल्प सदरहू स्थापन झालेल्या संघटना / कंपनी / सहकारी संस्था / संस्थांचे लाभांत एका दस्ताने हस्तांतरीत / वर्ग करणे, त्यासाठी व इच्छुक फ्लॅटस् खरेदी घेवू इच्छीणारे गि-हाईकांबरोबर विक्रीचे व्यवहार करणेसाठी स्टॅम्पस् विकत घेणे, त्यावर जरुर ते साठेखत करारनामा / खरेदीखत / डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंट / चुक दुरुस्ती पत्र इत्यादी दस्तऐवज लिहुन वा सब रजिस्ट्रर वा नोटरीकडे नोंदवून देणे, त्यावरील किंमतीचा सर्व भरणा

नक्कल - २

दि ५९८३ २०१६

९९ / २३

10

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS II NASHIK

स्विकारणे, त्याच्या पावत्या देणे / घेणे, पावत्यांवर सहया करणे, ते दस्तऐवज संबंधीत, नाशिक, अगर अन्य निबंधकांचे कार्यालयात नोंदवून देणे, नोंदविणेचा दस्त, नोंदविणेसाठी हजर करणे, तो कबुल करणे, त्यावरील भरणा कबुल करणे, भरणा स्विकारल्याबद्दल व कबजा दिल्याबद्दल पावत्या देणे, त्यावर सहया करणे, ते विकणेसाठी आम्ही समक्ष हजर राहून जी–जी कामे केली असती ती–ती सर्व कामे करणे.

12. सदर मिळकतीवर धात्रक हाईटस् या नावाने संस्था स्थापन करणेचा उल्लेख आहे ती संस्था – (1) महाराष्ट्र ओनरशिप अपार्टमेंट ॲक्ट अगर (2) सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट कायद्यातील तरतुदींनुसार वा स्थापन करावयाची आहे व त्यानुसार संस्थेचे नियम व अधिनियम ठरविण्यात येतील व त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांची मंजूरी जरूर त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घ्यावयाची आहे.

13. थोडक्यात सदर मिळकतीतील बांधकामाचा प्रकल्प सुरु करून त्यातील फ्लॅटस् विकणे व बांधकामासाठी ज्या–ज्या पुर्तता करणेसाठी ज्या–ज्या गोष्टी जी–जी कागदपत्रे केली असती, जी–जी कायद्यानुसार व आवश्यक ती कामे केली असती, ती–ती सर्व कामे करणेचा आम्हांस प्राप्त असलेले हक्कांचा वापर करून केली असती ती–ती सर्व कामे तुम्ही करणे.

14. सदर मिळकतीचे डेव्हलपमेंट, बेटरमेंट चार्जेस, स्क्रुटिनी, इतर शासकीय, निमशासकीय फी हे तुम्ही भरावयाचे आहेत.

15. सदर मिळकतीचा बिल्डींग प्लॅन तुम्हांस योग्य वाटेल त्या आर्किटेक्टकडून तयार करून घ्यावयाचा आहे आणि नाशिक महानगरपालिकेकडून तो मंजूर करून घ्यावयाचा आहे. याकरीता येणारा संपुर्ण खर्च हा तुम्ही करावयाचा आहे. आर्किटेक्ट फी, खर्च, स्टॅम्प व इतर खर्च तुम्ही करावयाचा आहे.